RNI No. MAHBIL/2009/31949

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-ल

वर्ष २, अंक ५८(५)] मंगळवार, सप्टेंबर २८, २०१०/आश्विन ६, शके १९३२ [पृष्ठे ७

किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक १९२

## प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

## उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ सप्टेंबर २०१०

## अधिसूचना

किमान वेतन अधिनियम, १९४८.

क्रमांक किवेअ. ५२०१०/सीआर. १३३४/कामगार--७.--ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील '' कोणत्याही दुकानातील किंवा व्यापारी आस्थापनेतील कामधंदा '' (कोणत्याही बँकेतील कामधंदा किंवा अनुसूचीतील नोंदीपैकी कोणत्याही नोंदीत जो समाविष्ट असेल असा कामधंदा वगळून) या नोंदीच्या प्रयोजनाकरिता दुकाने व व्यापारी आस्थापना या संज्ञांना मुंबई दुकाने व व्यापारी आस्थापना अधिनियम, १९४८ यांत नेमून दिल्याप्रमाणे अर्थ असतील. अशा कोणत्याही उद्योगातील रोजगारात (यापुढे ज्याचा उक्त अनुसूचित रोजगार असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) कामावर असलेल्या कामगारांना देय असलेले किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक किवेअ. २२००३/सीआर. १२७/कामगार-७, दिनांक २० जुलै २००४ अन्वये पुनर्निर्धारित केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, पुनर्विलोकन करून उक्त अनुसूचित रोजगारातील कामगारांना देय असलेले किमान वेतन दर पुनर्निर्धारित करण्याचे ठरविले आहे ;

त्याअर्थी, आता किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) चा खंड (ब) आणि कलम ५ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक किवेअ. १२००९/प्र. क्र. १२११/कामगार-७, दिनांक २ डिसेंबर २००९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रस्तावाच्या संबंधात मिळालेली सर्व अभिवेदने विचारात घेतल्यानंतर आणि सल्लागार मंडळाचा सल्ला विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक २८ सप्टेंबर २०१० पासून उक्त अनुसूचित रोजगारात नोकरीत असलेल्या यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ क्रमांक (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतनाचे किमान दर निश्चित करीत आहे.

## अनुसूची

| अ. क्र. (१) | कामगारांची वर्गवारी (२) | मूळ किमान वेतन दर (दरमहा रुपये) (३) परिमंडळ-१ | परिमंडळ-२ | परिमंडळ-३ |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल | ५८००.०० | ५५००.०० | ५२००.०० |
| २ | अर्धकुशल | ५४००.०० | ५१००.०० | ४८००.०० |
| ३ | अकुशल | ५०००.०० | ४७००.०० | ४४००.०० |

स्पष्टीकरण :– या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ.—

(ए) परिमंडळ-१.–महाराष्ट्र राज्यातील सर्व ' अ ' व ' ब ' वर्ग महानगरपलिकांच्या हद्दीमधील क्षेत्रांचे मिळून होईल ;

(बी) परिमंडळ-२.–महाराष्ट्र राज्यातील सर्व ' क ' व ' ड ' वर्ग महानगरपलिका, ' अ ' वर्ग नगरपरिषदा व सर्व छावणी क्षेत्रांचे मिळून होईल ;

(सी) परिमंडळ-३.–परिमंडळ १ व २ वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्रांचे मिळून होईल ;

(डी) रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांस देय असलेले मजुरीचे किमान दर तो कामगार ज्या वर्गाचा असेल त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजुरीच्या दरांना २६ ने भागून येणारा भागाकार नजिकच्या पैशापर्यंत पूर्णांकात करून काढण्यात येईल ;

(इ) अर्धवेळ काम करणाऱ्या कामगारांना देय असलेल्या प्रतितास किमान वेतनाचा दर तो कामगार ज्या वर्गवारीचा असेल, त्या वर्गवारीच्या रोजंदारी किमान वेतनास ८ (तास) ने भागून व त्यात १५% वाढ करून तसेच येणारी रक्कम नजिकच्या पैशापर्यंत पूर्णांकात परिवर्तित करण्यात येऊन काढण्यात येईल ;



(एफ) किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल ;

(जी) किमान वेतन दरामध्ये मूळ वेतन दर व विशेष भत्ता या सर्व दरांचा समावेश असेल ;

(एच) एखादा कुशल कामगार म्हणजे जो स्वतःचा निर्णय शक्तीनुसार आपले काम कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार पाडू शकतो असा कामगार ;

(आय) अर्धकुशल कामगार म्हणजे सर्वसाधारणपणे नित्याच्या स्वरूपाचे काम करतो की, ज्यामध्ये निर्णय घेण्याची फारशी गरज नसते. परंतु तुलनेने त्याला दिलेले छोटेसे काम की, ज्यामध्ये महत्त्वाचे निर्णय इतरांकडून घेतले जातात असे काम योग्यरितीने पार पाडण्याची आवश्यकता असते. मर्यादित व्याप्तीचे नित्याचे काम पार पाडणे हेच त्याचे कर्तव्य असते ;

(जे) अकुशल कामगार म्हणजे ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही. परंतु तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे. असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार, म्हणून त्याच्या कामासाठी शारीरिक परिश्रमाशिवाय निरनिराळ्या वस्तुंची किंवा मालाची त्याला चांगली माहिती असणे आवश्यक असेल.

## परिशिष्ट

महाराष्ट्र राज्यातील दहा केंद्रांचा सरासरी ग्राहक मूल्य निर्देशांक (नवीन मालिका १९८२=१००) हा उक्त अनुसूचित रोजगारात नोकरीत असलेल्या कामगारांना लागू असलेला व राहणीमान निर्देशांक असेल. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी १ जानेवारी आणि १ जुलै रोजी सुरु होणाऱ्या प्रत्येक सहामाहीच्या समाप्तीनंतर, त्या सहा महिन्यांसाठी उक्त कामगारांना लागू असलेल्या राहणीमान निर्देशांकाची सरासरी काढेल आणि ८०४ निर्देशांकावर अशा प्रत्येक अंकाच्या वाढीसाठी ज्या सहामाहीच्या संबंधात, अशी सरासरी काढण्यात आलेली असेल, त्या सहा महिन्यालगत पुढील सहामाहीसाठी उक्त कर्मचाऱ्यांना देय असलेला विशेष भत्ता (यात यानंतर ज्याचा " राहणीमान भत्ता " असा निदेश करण्यात आलेला आहे.) दरमहा रुपये ५.४० या दराने असेल.

२ सक्षम प्राधिकारी, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, उपरोक्तप्रमाणे हिशेब करून काढलेला राहणीमान भत्ता जेव्हा जानेवारी ते जून या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये आणि जेव्हा जुलै ते डिसेंबर या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये जाहीर करील :

परंतु, सक्षम प्राधिकारी, किमान वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेला राहणीमान भत्ता, जून किंवा डिसेंबर अखेरपर्यंत किंवा यथास्थिति, किमान वेतन दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकानंतर लगेचच जाहीर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

बा. शि. वानखेडे,

शासनाचे उप सचिव.

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, Industries, Energy and Labour Department No. MWA. 52010/CR-1334/Lab-7, dated the 28th September 2010, is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. S. WANKHEDE,
Deputy Secretary to Government.

## INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 28th September 2010

*NOTIFICATION*

MINIMUM WAGES ACT, 1948.

No. MWA. 52010/CR-1334/Lab-7.—Whereas by the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No MWA. 22003/C.R. 127/Lab-7, dated the 20th July 2004 the Government of Maharashtra has revised the minimum rates of wages payable to the employees employed in the Scheduled employment *viz.* "Employment in shop or comercial establishment (not being an employment in any bank or an employment which is included under any other entries in the schedule to the said Act)," (hereinafter referred to as "the said scheduled employment") in the State of Maharashtra ;

And, whereas, the Government of Maharashtra, having reviewed the minimum rates of wages payable to the employees employed in the said Scheduled employment, considers it expedient to revise them further ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*1*) of section 3, read with sub-section (*2*) of section 5 of the Minimum Wages Act, 1948 (XI of 1948), in its application to the State of Maharashtra, the Government of Maharashtra, after considering all the representations received by it in respect of the proposal published in the Government Notification, Industries, Energy and Labour Department, No. MWA. 92009/CR-1211/Lab-7, dated 1st December 2009 and after consulting the Advisory Board, hereby revises, with effect from the 28th September 2010 the minimum rates of wages payable to the employees employed in the said scheduled employment and refixes them, as set out in column No. (3) of the said Schedule appended hereto, as the minimum rates of wages payable to the class of employees employed in the said scheduled employment mentioned against them in column No (2) of the said Schedule.



*Schedule*

| Sr. No. | Class of Employees | Basic Rates of Wages (Per month Rs.) | | |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | | |
| | | *Zone-I* | *Zone-II* | *Zone-III* |
| 1 | Skilled | 5800.00 | 5500.00 | 5200.00 |
| 2 | Semi-skilled | 5400.00 | 5100.00 | 4800.00 |
| 3 | Unskilled | 5000.00 | 4700.00 | 4400.00 |

*Explanation.*—For the purposes of this notification–

(*a*) *Zone I*–Shall comprise of the areas falling within the limits of all 'A' and 'B' class Municipal Corporations ;

(*b*) *Zone II*–Shall comprise of the areas falling with in the limits of all 'C' and 'D' class Municipal Corporation 'A' class Municipal Councils and Cantonment areas ;

(*c*) *Zone III*–Shall comprise of all other areas in the State, which are not included in *Zone I* and *Zone II* ;

(*d*) the minimum rates of daily wages payable to an employee employed on daily wages, shall be computed by dividing the minimum rates of monthly wages fixed for the class of employees to which he belongs by twenty-six the quotient being stepped upto the nearest *paisa* ;

(*e*) The minimum rates of hourly wages payable to part-time employee shall be computed by dividing the daily rates of minimum wages applicable to the concerned class of employees by eight (hours) with 15 % rise in it and quotient being stepped up to the nearest *paisa* ;

(*f*) the minimum rates of wages shall be inclusive of payment of remuneration in respect of weekly day of rest ;

(*g*) the minimum rates of wages shall consist of basic rates, the cost of Living Allowance ;

(*h*) a skilled employee is one who is capable of working efficiently, of exercising considerable independent judgement and discharging his duties responsibly ;

(*i*) a semi-skilled employee is one, who does work generally of a well defined routine nature, wherein the major requirement is not so much of the judgement, skills and dexterity, but of proper discharge of duties assigned to him for a relatively narrow job and important decisions are made by others. His work is thus limited to the performance of routine operation of limited scope ;

(*j*) an unskilled employee is one, who does operations that involve the performances of simple duties which require the exercise of little or no independent judgement or previous experience although a familiarity with the occupational environment is necessary. His work may thus require in addition to physical exertion and familiarity with a variety of articles or goods.

## APPENDIX

The average Consumer Price Index Number in respect of ten centres in the State of Maharashtra for working class (New Series 1982=100) shall be the Cost of Living Index Number applicable to the employees employed in the said scheduled employment. The Competent Authority appointed by Government shall, after the expiry of every six months commencing on the first day of January and the first day of July, calculate the average of the Cost of Living Index Number applicable to the said employee for these six months and ascertain the rise of such average over 804 points. For such rise of every point, special allowance (hereinafter referred to as "the Cost of Living Allowance") payable to the employee in the said scheduled employment for each of the six months immediately following six months in respect of which such average has been calculated at the rate of Rs. 5.40 per month in respect of all *Zones*.



2. The Cost of Living Allowance computed as aforesaid shall be declared by the Competent Authority by notification in the *Official Gazette*, in the last week of July when such allowance is payable for each of the months from July to December and in the last week of January when such allowance is payable for each of the months from January to June :

Provided that, the Competent Authority shall declare the Cost of Living Allowance Payable in respect of the period from the date of fixation of the rate of minimum wages to the end of December or June, as the case may be, immediately after the said date with effect from which the minimum rates of wages are fixed.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. S. WANKHEDE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

कामगार आयुक्त यांचे कार्यालय
कामगार भवन,ब्लॉक " ई "
प्लॉट नं.सी-२०, दुसरा मजला,
वांद्रे कुर्ला संकुल, सीटीपार्क जवळ,
वांद्रे(पूर्व), मुंबई -४०० ०५१.

दिनांक:- २५ ऑक्टोबर २०१०

**किमान वेतन अधिनियम,१९४८**
**विशेष भत्त्याचे दर जाहीर करणेबाबत**

१)मोटार दुरूस्ती कार्यशाळा उद्योग २) शाईपेन व बॉलपेन बनविणारा उद्योग ३) कागद व कागदी पुठ्ठा बनविणारा उद्योग ४)दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग ५) सफाईगार व मेहत्तर कामधंदा ६) लाकूड कटाई उद्योग या अनुसूचित उद्योगाचे किमान वेतन दि.२८ सप्टेंबर २०१० रोजीच्या अधिसूचनेन्वये पुनर्निर्धारित करण्यात आलेले आहे. तसेच ७) रबरी फुगे बनविणे उद्योग व ८) हातमाग उद्योग या अनुसूचित उद्योगाचे किमान वेतन दि.२९ सप्टेंबर २०१० रोजीच्या अधिसूचनेन्वये पुनर्निर्धारित करण्यात आलेले आहे. सदर अधिसूचनेतील तरतूदीनुसार खालील रकाना क्र.२ मध्ये दर्शविलेल्या अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता त्यांचासमोरिल रकाना क्र.३ मधील कालावधीकरिता रकाना क्र.४ मध्ये विशेष भत्त्याचा दर जाहीर करण्यात येत आहे.

| अ.क्र | अनुसूचित उद्योगाचे नांव | कालावधी | परिमंडळ | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | परि-१ | परि-२ | परि-३ |
| | | | रूपये (दरमहा) | रूपये (दरमहा) | रूपये (दरमहा) |
| १ | २ | ३ | ४ | | |
| १ | मोटार दुरूस्ती कार्यशाळा आणि मोटारघरे यातील कामधंदा | दि.२८-९-२०१० ते दि.३१-१२-२०१० | ७११.२० | ७११.२० | ७११.२० |
| २ | प्लॅस्टिक,बॅकेलाईट,एबोनाईट, किंवा इतर कोणत्याही धांतूपासून फाउन्टन पेन्स,बॉलपॉईण्ट पेन्स आणि/किंवा त्यांचे सुटे भाग आणि/किंवा निब,रिफिल यांच्यासारख्या अनुषंगिक वस्तू बनविण्याचा उद्योग | दि.२८-९-२०१० ते दि.३१-१२-२०१० | ९७१.७५ | ९७१.७५ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | कागद व कागदी पुठ्ठयांच्या कारखान्यातील कामधंदा | दि.२८-९-२०१० ते दि.३१-१२-२०१० | २१२.७५ | २१२.७५ | २१२.७५ |
| ४ | कोणत्याही दुकानातील किंवा व्यापारी आस्थापनेतील कामधंदा | दि.२८-९-२०१० ते दि.३१-१२-२०१० | १९९.८० | १९९.८० | १९९.८० |
| ५ | सफाईगार व मेहत्तर कामधंदा | दि.२८-९-२०१० ते दि.३१-१२-२०१० | ६६६.७५ | ६६६.७५ | ६६६.७५ |
| ६ | लाकूड कटाई उद्योग | दि.२८-९-२०१० ते दि.३१-१२-२०१० | ५६१.७५ | ५६१.७५ | ५६१.७५ |
| ७ | रबरी फुगे बनविणा-या उद्योगातील कामधंदा | दि.२९-९-२०१० ते दि.३१-१२-२०१० | ९५५.५० | ९५५.५० | ९५५.५० |
| ८ | हातमाग उद्योगातील कामधंदा | दि.२९-९-२०१० ते दि.३१-१२-२०१० | ५३९.७५ | ५३९.७५ | ५३९.७५ |

( म. न. थोरात.) 5/10/10
कामगार उप आयुक्त (ग्रा.वि.आणि अं )
व सक्षम प्राधिकारी, किमान वेतन
अधिनियम,१९४८,मुंबई.

d9 kerker c -d 8